# दिनांक ०७/१२/२०२१ रोजीचा दैनिक गुन्हे अहवाल (भाग १ ते ५) अमरावती शहर

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | चोरीस गेला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/ पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १. | पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | १८९३/२०२१कलम ३७९,५११ भादवी | चोरी | टाटासुमो क्र. एम एच ए ए ००८१ कि. अं. २,५०,०००/- | राजपुरोहीत नगर मंगलधाम महादेवखोरी रोड अमरावती | दि. ६/१२/२१ चे रात्री ०१.३० वा चे सुमारास | दि. ०६/१२/२१चे ११.४४ वा | सिदार्थ भिमरावजी मेश्राम वय ४१ वर्ष रा. राजपुरोहीत नगर मंगलधाम महादेवखोरी रोड अमरावती | अज्ञात | पोउपनी रजमल्लु पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती दि. ०६/१२/२१ चे १०.०० वा ते ११.०० वा पर्यत | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे पंतप्रधान ग्राम सडक योजना या कार्यालयाचे टाटासुमो एम एच २७ ए ए ००८१ या गाडीवर चालक म्हणुन नोकरी करतात दि ०५/१२/२१ चे दुपारी १६.०० वा चे सुमारास सदर गाडी धुण्याकरीता आपले राहते घरी घेवुन गेले व गाडी घरासमोर उभी केली असता ०६/१२/२१ रोजी चे रात्री ०१.३० चे सुमारास गाडी चालु करण्याचा आवाज आला असता बाहेर येवुन पाहीले असता कोणीतरी अज्ञात चोरट्याने गाडी नेत असतांना दिसला आरडा ओरडा केली परंतु तो थांबला नाही तसेच फि.चे घरामागे राहणारे अजय बाबाराव दंदे वय ४७ वर्ष यांचे घरासमोर उभी असलेली त्यांची ग्रे रंगाची गाडी क्र. एम एच २७ बी जेड ८१४६ या गाडीचे ड्रायव्हर साईडचे लॉक तोडुन नेण्याच्या प्रयत्न केला असे फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| २. | फ्रेजरपुरा | १८९४/ २१ क. ३७९ भादवि | चोरी | दोन Exide कंपनीचे बॅटरीव एक ब्लॅक पावरची बॅटरी असा असुन किंमत अं.१५०००/- तसेच तिन जैं जुनी वापरते किं.३०००/- असा एकुण १८०००/- चा | वडाळी बस स्टॉप अमरावती | दि. ५.१२०. २१ चे १८.३० ते दि.६.१२. २१ चे ०८.३० वा दरम्यान | दि. ६.१२.२१ चे १६.०७ वा. | सैययद अफसर साहेब अली, वय ५२, रा. पठाण चौक भातकुली रोड अमरावती | अज्ञात | भेट देणार व दाखल अधिकारी - पोउपनि राजेन्द्र कलांद्रे, पो स्टे फ्रेजरपुरा अम. श. भेट देण्याची वेळ दि.६/१२/२१ चे १५.३० ते १६.०० वा . | हकिकत अशा प्रकारे आहे की यातील फि.हे. यांनी नमुद घटना स्थळी येथे दोन टाटा एस टिप्पर सहा चक्का गाडी क्र. Mh BX ५७७० येथे गाडी क्र. CG ८९०८ मुरुम फेकने करीता कंपनीत लावले होते. नमुद घ. ता. वेळी व ठिकाणी फि. हे ड्राव्हर सह घटनास्थळी गेले असता दोन्ही गाडी बॅटरी दिसुन आली नाही तसेच बाजुला अब्दुल शाकीर यांच्या मालकीचे गाडी MH BX २२०५ गाडीची ब्लॅक पावंरची बॅटरी सुध्दा दिसुन आली नाही. शोध घेतला मिळुन आली नाही तसेच दोन Exide कंपनीचे बॅटरीव एक ब्लॅक पावरची बॅटरी असा असुन किंमत अं.१५०००/- तसेच तिन जैं जुनी वापरते किं.३०००/- असा एकुण १८०००/- चा माल कोणीतरी |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | माल | | | | | | | अज्ञात चोरटयाने चोरुन नेले. अशा फि. चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल तपासात घेतला.<br>गुन्हा लागलीच दाखल.<br>प्राथमीक तपासी अधिकारी - पोउपनि राजेन्द्र कलांद्रे, पो स्टे फ्रेजरपुरा अम. श. |
| ३. | नांदगावपेठ | ४६१/२०२१ कलम ३४२,३२४, ५०४,३४ भादवी | दुखापत करने | ------ | शेत शिवार शैवती जहागीर | दि. ०५/१२/ २०२१ चे २०.०० वा | दि. ०६/१२/ २०२१ चे ०१.५१ वा | आकाश पुरुषोत्तम अंबाडकर वय २२ वर्ष रा. झोपडपट्टी शेवती जहागीर | १.योगेश सुंडे<br>२.महेश सुंडे<br>दोन्ही रा. प्रभु कॉलणी अमरावती<br><br>आरोपी अटक नाही | पोहेका, प्रणय ब.न. ९४२ पोस्टे. नांदगावपेठ अमरावती<br><br>दि. ०५/१२/२०२१ चे २३.०० वा ते २३.३०पर्यंत | यातील हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी यातील किसन शर्मा यांच्या शेतात जेवणाची पार्टि होती त्या पार्टित असलेल्या जाकीर खान याने फिर्यादीला फोन करुन सांगितले की, आमच्या सोबत आलेली एक मैत्रीणीला बाजुच्या शेतातील दोन ईसमांनी त्यांचा रुममध्ये कोंडुन ठेवले आहे असे फोन आल्याने फिर्यादी त्या ठिकाणी गेले असता महेश सुंडे व योगेश सुंडे यांनी शिवीगाळ करुन लठाणे मारहान केली व नंतर त्या ठिकाणी अरुण मानीकराव लुंगे व मनोज लाजुरकर हे आले असता त्यांना सुध्दा महेश सुंडे व योगेश सुंडे यांनी लठाने मारहाण केली अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट व मेडीकल सर्टिफीकेट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासत घेतला<br>दा. अधिकारी--नापोका रुपनारायण ब.न. ५५ पोस्टे .नांदगावपेठ<br>तपासी अधिकारी - पोहेका, प्रणय ब.न. ९४२ पोस्टे. नांदगावपेठ अमरावती मो.न. ९८२३४१२७२९ |
| ४. | गाडगे नगर अमरावती शहर | २९२३/२०२१ कलम ३९२ भादवि | जबरी चोरी | ८,०००/- रू चा मोबाईल व नगदी ८००/- रू असा एकुण ८,८००/- रू चा माल | बौध्द विहार जवळ महेद्र कॉलनी अमरावती | दि ०६.१२. २०२१ चे ११.३० वा | दि ०६.१२. २०२१ चे १९.४६ वा | शुभम राजेंद्र कचरे वय २८ वर्ष धंदा पेंटर रा महेंद्र कॉलनी खैरया नगर अमरावती | अमिन रहेमान खान वल्द अनिसुर रहेमान खान वय ३१ वर्ष रा नुर नगर नं०२ अमरावती आरोपी अटक आहे | पोउपनि चौव्हाण सोबत पोस्टॉफ पोस्टे गाडगे नगर अमरावती शहर दि ०६.१२.२०२१ चे १९.४५ वा ते २०.१५ वा | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीला आरोपीने फोन करण्याकरिता फिर्यादीचा मोबाईल मागितला असता फिर्यादीने त्याला मोबाईल देण्यास नकार दिल्यावरून आरोपीने फिर्यादीचा ओप्पो एफ १९ कंपनीचा मोबाईल ज्याचा IMEI NO १- ८६०२१३५५०९४५७५, २- ८६०२१३०५५०९४५६७ असा ८,०००/- रू चा मोबाईल व नगदी ८००/- रू असा एकुण ८,८००/- रू चा माल फिर्यादीचे शर्टच्या खिश्यातुन बळजबरीने हिसकावुन ॲक्टीव्हा गाडीने पळुन गेला. अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | करून तपासात घेतला<br>लागलीच दाखल<br>दाखल अधिकारी पोउपनि चौव्हाण पोस्टे गाडगे नगर अमरावती शहर<br>तपासी अधिकारी सपोनि इंगोले पोस्टे गाडगे नगर अमरावती शहर |
| ५. | गाडगे नगर अमरावती शहर | २९२४/२०२१ कलम ३७९, ५११ भादवि | चोरीचा प्रयत्न करणे | ----- | कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती | दि. ०६.१२. २०२१ चे १९.३० वा | दि ०६.१२. २०२१ चे २१.४४ वा | भुजंग लक्ष्मण डोईफोडे वय ४९ वर्ष व्यवसाय कृषी उत्पन्न बाजार समिती सहायक सचिव रा राममोहन नगर अमरावती | माथ्या उर्फ शिवकुमार लक्ष्मण प्रसाद गौतम वय ४६ वर्ष रा सिध्दार्थ नगर सिव्हील लाईन अमरावती | पोउपनि चौव्हाण सोबत पोस्टॉफ पोस्टे गाडगे नगर अमरावती शहर दि ०६.१२.२०२१ चे २१.४५ वा ते २२.१५ वा | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे कृषी उत्पन्न बाजार समिती येथे सहायक सचिव आहे फिर्यादीला यातील आरोपी हा चोरी करण्याचे उददेशाने कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात फिरतांना दिसुन आला व तो कृषी उत्पन्न बाजार समितीचे अडते यांचे कडील वजन मापाचे गोटे चोरी करतांना CCTV फुटेज मध्ये स्पष्ट दिसल्याने यातील फिर्यादीने व कृषी उत्पन्न बाजार समितीतील अडते व्यापारांनी आरोपीला संशयीत रित्या फिरतांना दिसुन आल्याने अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला<br>लागलीच दाखल<br>दाखल अधिकारी पोउपनि चौव्हाण पोस्टे गाडगे नगर अमरावती शहर<br>तपासी अधिकारी पोहेकॉ इखार बनं ८५९ पोस्टे गाडगे नगर अमरावती शहर |
| ६. | वलगाव | ७२७/२०२१ कलम २७९,३३७ भादवी सहकलम ४१,१७७ मो.वा. का, | अपघात करुन जखमी करणे | -- | ग्राम मक्रमपुर फाटा , वलगाव | ०५/१२/ २०२१ चे २१/१५ वा. | ०६/१२/ २०२१ चे ०३/१९ वा. | महिला | धर्मेन्द्र मिलींद आमटे वय ३५ वर्ष रा. इंदिरा नगर धुगुस जि. चंद्रपुर (आरोपी अटक नाही ) | पोउपनि विजय गिते सा. पोस्टे वलगाव अमरावती शहर दि,०६/१२/२०२१ चे २२/०० वा. ते २३/१५ वा. दरम्यान दाखल अधिकारी - | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी ह्या अमरावती वरुन परतवाडा कडे जात असतांना यातील फिर्यादी यांची गाडी क्र.MH २७ AR ००८५ ही मक्रमपुर फाट्या जवळ बंद पडली असता ती गाडी साईडला केली व पार्कीग लाईट लावुन फिर्यादीचे पतीने पाहणी केली असता गाडी चालु करण्याचा प्रयत्न केला परंतु गाडी सुरु झाली नाही वरुन फिर्यादीचे पती पेट्रोल आणणेकरीता पेट्रोलपंप वर गेले असता फिर्यादी हया गाडीत बसुन होती तेवढ्यात गाडीच्या मागच्या बाजुने विना नंबर असलेली दुचाकी मो.सा (FZ) चे चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | पोउपनि विजय गिते सा. पोस्टे वलगाव अमरावती शहर. | निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे वाहनास मागुन ठोस मारली त्यामुळे यातील आरोपी मो.सा चालक हा स्वताहा जखमी झाला .अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात झाला.<br>विलंबाचे कारण - लागलीच<br>तपासी अधिकारी - पोहेकाँ निवासराव घुगे ब.न ७०६ पोस्टे वलगाव अमरावती शहर मो.क्र.९०४९९७४६६४ |
| ७. | वलगाव | ७२९/२०२१ कलम ३७९ भादवी | मो.सा चोरी | पँशन प्रो क्रमांक MH २७ AV १६८० किंमत अंदाजे २५,०००/ रुपये. | वरवाड चेतक बारचे मागे वलगाव | ०५/१२/ २०२१ चे २१/३० वा.ते दि.०६/१ २/२०२१ चे सकाळी ०८/०० वा. दरम्यान | ०५/१२/ २०२१ चे १८/३४ वा. | अजय मनोहर अडागळे वय ४० वर्ष रा. वरवाड चेतक बारचे मागे , वलगाव. | अज्ञात (आरोपी अटक नाही ) | ASI गणेश बाभुळकर ब.न ७६४ पोस्टे वलगाव अमरावती शहर दि.०५/१२/२० २१ चे १८/४० ते १९/१० वा. | हकीकत अशा प्रकारे आहे की,नमुद घटना. ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यानी त्याची मो.सा क्र. MH २७ AY १६८० पँशन प्रो. काळ्या रंगाची किंमत अंदाजे २५,०००/ रुपये ची हि दि. ०५/१२/२०२१ चे रात्री २१/३० वा. घराचे गेटच्या आत ठेवली असता व सकाळी ०८/०० वा.झोपेतुन उठुन पाहले असता फिर्यादी यांची मो.सा क्र,MH २७ AY १६८० ही घराचे अंगणात दिसुन आली नाही ती कोणीतरी अज्ञात चौराने चोरुन नेली अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला .<br>विलंबाचे कारण - लागलीच<br>तपासी अधिकारी - पोउपनि अयुब शेख पोस्टे वलगाव अमरावती शहर मो.क्र. ७००७८५१७०३ |
| ८. | वलगाव | ७३०/२०२१ कलम ३५४ (अ) ,३२४ भादवी | विनयभंग करुन मारहाण करणे . | -- | वलगाव | ०६/१२/ २०२१ चे १८/०० वा. | ०६/१२/ २०२१ चे १९/५० वा. | एक महिला | सचीन मधुकर चारथळ वय ४० वर्षे रा. धनगरपुरा वलगाव (आरोपी अटक ) | ASI मारोती कळंबे ब.न १००४ पोस्टे वलगाव अमरावती शहर दि.०६/१२/२० २१ चे २०/०० ते २०/३० वा. दाखल अधिकारी - ASI गणेश बाभुळकर ब.न | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी व आरोपी हे एकाच मोहल्यात राहणारे असुन नमुद घटना. ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी ही घरासमोरील ओटयावर बसली असता यातील आरोपी तेथे आला व फिर्यादीस अश्लिल म्हटले त्यामुळे फिर्यादीचे मनात लज्जा निर्माण झाली वरुन यातील फिर्यादी व आरोपी यांचा वाद झाला तर यातील आरोपी याने रोडवरील विट हातात घेवुन फिर्यादीचे डोक्याचे डावे बाजुला मारले त्यामुळे फिर्यादी ही जखमी झाली अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट व मेडी. सर्टी. वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.<br>विलंबाचे कारण - लागलीच<br>तपासी अधिकारी - प्रो.पोउपनि अविद्या शिरसाट मँडम |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | ७६४ पोस्टे वलगाव अमरावती शहर. | पोस्टे वलगाव अमरावती शहर मो.क्र. ८९७५८१५२०७ |
| ९. | राजापेठ | १४४३/२०२१ कलम ४५२, ३८० भादवी | चोरी | गळ्यातील पोत | अमरावती | दि. ६/१२/२१ चे १०/३० वा | दि. ६/१२/२१ चे १८/४६ वा | एक महिला | एक महिला | सपोनि प्रशाली काळे पोस्टे राजापेठ दि.६/१२/२१ चे १८/०० वा ते १९/०० वा ९६८९३५०१७६ | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील आरोपी महीले तिचे उधार दिलेले पैशे घेण्याकरीता फिर्यादीचे धरी अतीशय आक्रमक पध्दतीने जावुन फिर्यादीचे पतीला कानपटीत मारली व फिर्यादी अडविण्यास गेली असता झोंबाझोबी केली व झटापटीत आरोपी नमुद महीलेने फिर्यादी चे गळ्यातील पोत चोरी करुन घेवुन गेली अशा फिर्यादी चे जबानी रिपोर्ट वरुन सदरची गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.<br>दाखल अधी --- सपोनि प्रशाली काळे पोस्टे राजापेठ<br>तपाशी अंमलदार-- पोहेकॉ जिवन बांडे ब.न.१७५७ ७०२०९९६१४१ |
| १०. | राजापेठ | १४४४/२१ कलम ३७९ भादवी | चोरी | तिन नग ट्रक ची बॅटरी की.अ. १७०००/- रुपये | मायानगर देशी दारु दुकान जवळ अमरावती | दि. ०६/१२/२१ चे पुर्वी | दि. ६/१२/२१ चे २२/४७ वा. | विजय रमेशचंद शर्मा वय ५५ वर्ष रा.डी मार्ट मागे कन्हैया कुंज हॉटेल च्या बाजुला अमरावती | अज्ञात | सपोनि प्रियंका कोठावार दि.६/१२/२१ चे २१/०० वा ते २२/०० वा | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घटना .ता.वेळी व ठीकाणी यातील फिर्यीद यांचे ऑफीस समोर उभे असलेल्या ट्रक क्र MH ०६ AQ ४५९२ व MH -०४-CA ६५१२ मधील तिन बॅटरी की.अं.१७०००/- रुपये कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्या अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.<br>दाखल अधी / तपाशी अंधीकारी -- --- सपोनि कोठावार<br>विलंबाचे कारण -- फिर्यादी कडुन विलंब |
| ११. | पो.स्टे.सिटी कोतवाली अम.शहर | १२२९/२१ कलम ३७९ भादंवि | वाहन चोरी | स्पेन्डर गाडी क्र. MH 27 AW 8926 ग्रे पट्टा असलेली चेचिस क्र. MBLHA10 MBDHP6763 इंजिन नं. | सायस्सकोर मैदान अमरावती | दि. २/१२/२०२१ चे २०.०० वा. ते. २२.०० वा. गरम्यान | दि. ६/१२/२०२१ चे १४.१४ वा. | सचिन गजानन हनवते वय ३३ वर्ष धंदा मजुरी, मु. पो. कुपटा,ता. मानोरा,जि. | अज्ञात | पो. उप. नि. रेवस्कर पो. स्टे. सिटी कोतवाली अमरावती मो. न.८७८८८९५४६८. वेळ - दि. | हकीकत अशा प्रकारेआहे की फिर्यादी हे आपले कुटुबियासह दि. २/१२/२१ रोजी २०.०० वा. सायन्स कौर मैदान अमरावती येथे आनंद मेळावा बघण्याकरिता त्यांची स्पेन्डर गाडी क्र. MH 27 AW 8926 ग्रे पट्टा असलेली चेचिस क्र. MBLHA10MBDHP6763 इंजिन नं. HA10EJDHB38521 कि. अं. २०,०००/- रू.ची ने गेले व गाडी पार्कीगमध्ये पार्क करून आत मध्ये गेले |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | HA10EJDH B38521 कि. अं. २०,०००/- रू. | | | | वाशिम | | ६/१२/२०२१ चे १४.१४ वा.ते १४.३० वा. | २२.०० वा. मेळावा पाहुन परत आले असता गाडी ठेवलेल्या ठिकाणी दिसुन आली नाही. आजुबाजुला व आजपावेतो शोध घेतला मिळुन आली नाही. ती कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला.<br>विलंबनाची कारणे - फिर्यादी कडुन विलंब<br>तपासी अधिकारी - पो. उप. नि. रेवस्कर पो. स्टे. सिटी कोतवाली अमरावती मो. न.८७८८८९५४६८<br>दाखल अधिकारी - पो. उप. नि. रेवस्कर पो. स्टे. सिटी कोतवाली अमरावती मो. न.८७८८८९५४६८ |

## (भाग ६)

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | चोरीस गेला/ मिळाला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १. | राजापेठ | १४४२/२१ कलम. १८८ भा.द.वी. | आदेशाचे उल्लघन | - | हाँटेल मोतीमहल डिलक्स गद्रे चौक अमरावती | दि. ०६/१२/ २०२१ चे ००/१० वा | दि. ०६/१२/ २०२१ चे ०१/२२ वा. | सरतर्फे सपोनि मानकर पो स्टे राजापेठ अमरावती शहर | १-सुजानसींग रामसींग दासोनी वय ५२ वर्ष रा नालासोपारा मुंबई ह मु हाँटेल मोतीमहल डिलक्स गद्रे चौक २. रोहीत सुनिल गद्रे वय ३५ रा.गद्रे चौक अमरावती | सपोनि मानकर पो स्टे राजापेठ दि. ०६/१२/२१ चे ०१.०० वा ते ०१.२२ वा दरम्यान. | थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादीने नाईट डीओ ड्युटी दरम्यान पेट्रोलींग करीत असतांना मा वपोनि सा यांचे सह डीबी पथकाने नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील आरोपीने आपले हाँटेल विनापरवाना रात्री उशीरा पंर्यत सुरू ठेवुन ग्राहकी करतांना मिळुन आले त्यास हाँटेल रात्री उशीरा पंर्यत चालु ठेवण्याचे कारणा विचारले असता असमाधानकारक उत्तरे दिली. सदर आरोपी ने मा पोलीस आयुक्त सा अमरावती शहर यांचे आदेश क्र पोआअ/विशा/१४४/सीआरपीसी/२९१९ दि. १३/११/२०२१ अन्वये संचारबंदी आदेशाचे उल्लंधन केले अशा फिर्यादीचे लेखी फिर्याद वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.<br>दाखल अधिकारी तपासी अधिकारी -सपोनि मानकर पो स्टे राजापेठ मो.क्र.-९०४९१२१३११<br>विलंबाचे कारण - लागलीच |

## (जुगार)

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | चोरीस गेला /मिळाला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | नागपुरी गेट अ म शहर | ८२७/२१ कलम १२(अ)मजुका | जुगार | नगदि १९४० रुपये जुगार साहित्य | झीब्राल शहा बाबा दर्गा चे बाजुला पठाण चौक अमरावती | ६/१२/२०२१ चे १३.३० ते १४.१५ वा | ६/१२/२०२१ चे १९.०८ वा | सर तर्फे पोहेका प्रमोद गुडधे ब.न २७७ पो स्टे ना गेट अम शहर | १) समीर खान दाउद खान वय ४० वर्ष रा रहेमत नगर अमरावती २) फिरोज खान रहेमान खान वय ३८ वर्ष रा अकबर नगर अमरावती समजपत्रावर रिहा | पोउपनी बळेगावे पो स्टे ना गेट अम शहर | हकीकतअशा प्रकारे आहे की नमुद घटना ता वेळी व ठिकाणी मिळालेल्या गुप्त बातमीवरुन आरोपीवर जुगार रेड केला असता आरोपी १ ते १० आकड्यावर जुगार वरली मटका खेळ चालवितांना मिळुन आले त्यांच्या ताब्यातुन वरिल प्रमाने माल मिळुन आला वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला .<br>दाखल अधि पोउपनि बळेगावे मँडम<br>तपास पोहेकां गुडधे ब.न २७७ पो स्टे ना गेट अम शहर |
| २ | वलगाव | ७२८/२०२१ कलम १२ (अ) मजुका | अवैध्य रित्या जुगार खेळणे | नगदी ३०५०/ रुपये व ०१ intel कंपनीचा मोबाईल किंमत अंदाजे ३०००/ रुपये ,०१ पेन व वरली मटक्याच्या आकडे लिहलेल्या चिठ्या असा एकुण ६०५०/ रुपयाचा माल | ग्राम रेवसा | ०६/१२/२०२१ चे १५/०० वा. | ०६/१२/२०२१ चे १७/३३ वा. | सरतर्फे - पोउपनि अयुब शेख पोस्टे वलगाव अमरावती शडर. | अशपाक शाह शरु शहा वय ३५ वर्षे रा. पाण्याचे टाकी जवळ, ग्राम रेवसा पुनर्वसन (आरोपी समजपत्रावर रिहा ) | पोउपनि अयुब शेख पोस्टे वलगाव अमरावती शहर दि.०६/१२/२०२१ चे १५/०० वा.<br><br>दाखल अधिकारी - ASI गणेश बाभुळकर ब.न ७६४ पोस्टे वलगाव अमरावती शहर. | हकीकत अशा प्रकारे आहे की, गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की, यातील नमुद आरोपी हा ०१ ते १० आकड्यावर लोकांकडुन पैसे घेवुन पैशाचे हारजीतवर वरली मटका नावाचा जुगार खेळ खेळवित आहे वरुन यातील नमुद आरोपीवर जुगार रेड. केला यातील जुगार खेळणारे लोक असता यातील आरोपीचे ताब्यातुन नगदी ३०५०/ रुपये व ०१ intel कंपनीचा मोबाईल किंमत अंदाजे ३०००/ रुपये ,०१ पेन व वरली मटक्याच्या आकडे लिहलेल्या चिठ्या असा एकुण ६०५०/ रुपयाचा माल यातील आरोपीचे ताब्यातुन जप्त करण्यात आला व तो पंचासमक्ष जप्त करण्यात आला वरुन यातील आरोपी विरुद्ध कलम १२ (अ) मजुका प्रमाणे गुन्हा दाखल करुन तपासात घेतला .<br>विलंबाचे कारण - लागलीच<br>तपासी अधिकारी - पोउपनि अयुब शेख पोस्टे वलगाव अमरावती शहर मो.क्र. ७००७८५१७०३ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | पोस्टे खोलापुरी गेट | ४९५/२०२१ कलम १२(अ)महा. जुगा.का. | जुगार बाबत | वरली मटक्याच्या चिठ्ठ्या, वरली मटक्याचे नगदी ३४१६०/- रुपये व ३ मोबाईल कि.अं.१०५००/-रुपये असा एकुण ४४६६०/-रु चा माल | बालाजी मंदीर जवळ सक्करसाथ अमरावती | ०६/१२/२०२१ चे १७/१५ वा सुमारास<br><br>लागलीच | ०६/१२/२०२१ चे २०/४३ वाजता | सरतर्फ पोउपनि बालाजी वळसणे पो स्टे खोलापुरी गेट अमरावती शहर | १)ज्ञानेश्वर नामदेवराव भातकुलकर वय ६८ वर्ष रा. महात्माफुले नगर नवसारी अमरावती २)मुकेश शामराव भलावी वय ३१ वर्ष रा.स्वागतम कॉलनी गोपाल नगर अमरावती ३)आकाश अनील मौर्य वय २५ वर्ष रा. साबनपुरा अमरावती ४)सचीन शर्मा वय ४० वर्ष रा.शनी मंदीर अमरावती (फरार)<br><br>आरोपी क्रं. १ ते ३ समजपत्रावर रिहा | सरतर्फ पोउपनि बालाजी वळसणे पो स्टे खोलापुरी गेट अमरावती शहर<br><br>दाखल अधिकारी सपोउपनि विजय पांडे बन.१४८४ पो स्टे खोलापुरी गेट अमरावती<br><br>०६/१२/२०२१ चे १७/१५ वा ते १७/४५ वा सुमारास | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे पो स्टॉंपसह पो स्टे हद्दीमदे पेट्रोलींग करीत असतांना मा.पोलीस आयुक्त सा. अमरावती शहर यांचे विशेष पथकातील सपोनि योगेश इंगळे यांनी फोनद्वारे माहीती दिली की, त्यांना गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की, बालाजी मंदीर सक्करसाथ येथे सचिन शर्मा नावाचा इसम लोकांकडुन पैसे घेवुन ०१ ते १० आकड्यावर पैशाचे हारजीतीचा परली मटका नावाचा जुगार खेळ खेळवित आहे. अशा माहीती वरुन नमुद घटना ता वेळि व ठिकानी फिर्यादी यांनी पो स्टॉंपव पंचासह व मा.पोलीस आयुक्त सा.यांचे विशेषपथकासह जुगार रेड केला असता नमुद आरोपीतांकडुन वरली मटक्याच्या चिठ्ठ्या,वरली मटक्याचे नगदी ३४१६०/-रुपये व ३ मोबाईल कि.अं.१०५००/-रुपये असा एकुण ४४६६०/-रु चा माल जप्त करुन ताब्यात घेतला. अशा फिर्यादीचे लेखि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.<br>तपासी अधिकारी<br>सरतर्फ पोउपनि बालाजी वळसणे पो स्टे खोलापुरी गेट अमरावती शहर |

## अकस्मात मृत्यू बाबत

| अ. क्र. | पो.ठाणे | अकस्मात मृत्यू क्रमांक व कलम | वारस/ बेवारस | हॉस्पीटल /ठिकाण | मयताचे नांव | वय वर्ष | स्त्री/ पुरुष | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ०९ | १० |
| १ | पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | ७९/२१ कलम १७४ जाफौ<br><br>दि. १९/११/२१ते ०६/१२/२१चे १.००वा | वारस | गोवर्धन टेकडी मंगलधाम मागे अमरावती | विशाल जयकुमार गजभिये वय ३५वर्ष रा.कैलास नगर महादेवखोरी | 35 | पुरूष | पोउपनी रजमल्लु पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती दि. ०६/१२/२१चे १०.००वा ते ११.००वा पर्यत | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांनी पोस्टेला येवुन जबानी रिपोर्ट देते की, फिर्यादी ही तिचे पती व मुलासह राहते व पती हे दारू पिण्याच्या व्यसनी असुन रोज घरी वाद होत होते त्या भांडणातुन माझे पती दि.१४/११/२१रोजी दुपारी १५.००वा गाडीचे कागदपत्र व इतर कागदपत्र घेवुन आईचे घरी गेले फि. दि. १८११/२१रोजी हि त्यांना भेटण्यास गेली असता तिचे पती हे तेथे हजर असुन झोपले होते वरून त्यांचे आईने उठवु नको झोपला आहे अले बोलले व भेटु दिले नाही वरून फि, हि पतीस भेटायला दि.१९/११/२१रोजी आईचे घरी गेली असता तिचे पती तेथे |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दरम्यान दाखल ता. वेळ ०६/१२/२१चे १४.५१ वा | | | अमरावती<br><br>गळफास घेवुन | | | | हजर मिळुन आले नाही वरून २५/११/२१रोज पोस्टे फ्रेजरपुरा येथे मिंसींग बाबत तक्रार नोंदवली दि. ०६/१२/२१ रोजी पोस्टे फ्रेजरपुरा येथुन फोनद्वारे माहीती मिळाले की तुमचा पती सारखा एक प्रेत मिळाले असुन फिर्यादी हे घटनास्थळी गेले असता फि.चे पतीची बॉडी कुजलेल्या अवस्थेत झाडाखाली पडुन होती व डोक्याचा भाग झ ाडाला दोरीला लटकलेल्या स्थितीत असुन पुर्ण चेहरा व बॉडी पुर्ण कुजलेल्या अवस्थेत होती फि.चे पतीचे हे मागील २ महीन्यापासुन दारू चे व्यसनी झाल्याने त्यांना कर्ज सुध्दा झाले होते त्याच कारणाने ते टेंशन मध्ये होते त्याच कारणाने त्यांनी आत्महत्या केली असावी अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून सदरचा मर्ग दाखल करून तपासात घेतला |